मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आता 'करो या मरो' अशीच निवडणूक

## आदित्य ठाकरेंचा मावळ लोकसभा मतदार संघातील पदाधिकाऱ्यांची संवाद




**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** सरकार बदलत असतात, पण देश आणि संविधान याला हात लावायला कोणी हिंमत केली नव्हती. संविधान बदलायची भाषा अजून कोणी केली नव्हती. देशाच्या लोकशाहीला धोका निर्माण होईल असं कृत्य कधीही कोणी केलं नव्हतं. पण आज आपल्या देशाला हाच धोका निर्माण झालेला आहे. ही निवडणूक झाली आणि चुकून भाजपाने बहुमत काबीज केलं, तर पाच वर्षांनंतर निवडणूका होईल की नाही? याच्यावर आपल्याला विचार करण्याची वेळ आली आहे. म्हणून आपल्याला मावळसह आणि प्रत्येक जागा जिंकावी लागणारच आहे. आता 'करो या मरो' ही अशीच निवडणूक झालेली आहे असे मत युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केले. आदित्य ठाकरे आज पिंपरी चिंचवड शहराच्या दौऱ्यावर होते. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मावळ लोकसभा मतदार संघातील पदाधिकाऱ्यांची संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे जिल्हा संपर्कप्रमुख तथा आमदार सचिन आहेर, मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, पिंपरी चिंचवड मावळ संपर्क प्रमुख लतिका पाष्टे, पिंपरी चिंचवड शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले, ज्येष्ठ नेते एकनाथ पवार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, अनिताताई तुतारे, शहर युवा अधिकारी चेतन पवार, उपजिल्हाप्रमुख वैशाली मराठे, निलेश मुटके, धनंजय आल्हाट, तुषार नवले, अनंत कोऱ्हाळे, रोमी संधू, हाजी मणियार दस्तगीर, डॉ. वैशाली कुलथे, कल्पना शेटे, तुषार नवले, मिनल यादव आदींसह पक्षाचे उपशहरप्रमुख, संघटक, उपसंघटक, सर्व प्रमुख पदाधिकारी आणि शिवसैनिक या मेळाव्यास उपस्थित होते.आदित्य ठाकरे म्हणाले की, पाच वर्षानंतर निवडणुका होतील की नाही? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळं ही लोकसभा निर्णायक ठरणार आहे. लोकशाही संपविण्याचा, संविधान मोडीत काढण्याचा डाव या सरकारचा आहे. २०२३ मध्ये एक पक्ष फोडला, मग एक कुटुंब फोडलं. आता २०२४ मध्ये काँग्रेस पक्षात फूट पाडली जात आहे. नेहरू, गांधी, काँग्रेसने ६५ वर्षांत काय केलं असं २०१४ पूर्वी म्हणणं योग्य होतं. पण आता हे म्हणतात ७५ वर्षात काँग्रेसने काय केलं? आता सांगा ही १० वर्षे भाजपकडे आहेत. त्यातील पाच वर्षे आपण त्यांच्यासोबत होतो, कारण अच्छे दिन येणार म्हणाले म्हणून आपण ही त्यांच्या प्रचार केला. मात्र अच्छे दिन आलेत का? महागाई किती वाढली आहे, बेरोजगारांच्या हाताला रोजगार आहे का? हे अंधभक्तांनी ही लक्षात घ्यावं. आज ३७० कलम महाराष्ट्रावर लावलंय का? अशीच परिस्थिती सध्या आपल्या राज्यात निर्माण झालेली आहे.
मावळ लोकसभेतून गद्दार लढतील का? याची अद्याप खात्री नाही. तळेगाव मधून वेदांता हा उद्योग गुजरातला गेला तेव्हा मावळचे खासदार गप्प का होते? असा सवालही ठाकरे यांनी उपस्थित केला. मावळ लोकसभा हा आपला हक्काचा मतदारसंघ आहे. त्यामुळे आता येथून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाच खासदार निवडून गेला पाहिजे. त्यासाठी आपण मैदानात उतरणार असल्याचे शेवटी बोलताना ते म्हणाले.

### यांची होती उपस्थिती

» आपल्याला मावळसह आणि प्रत्येक जागा जिंकावी लागणारच आहे. आता 'करो या मरो' ही अशीच निवडणूक झालेली आहे असे मत युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केले.आदित्य ठाकरे आज पिंपरी चिंचवड शहराच्या दौऱ्यावर होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे जिल्हा संपर्कप्रमुख तथा आमदार सचिन आहेर, मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, पिंपरी चिंचवड मावळ संपर्क प्रमुख लतिका पाष्टे, पिंपरी चिंचवड शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले, ज्येष्ठ नेते एकनाथ पवार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, अनिताताई तुतारे, शहर युवा अधिकारी चेतन पवार, उपजिल्हाप्रमुख वैशाली मराठे, निलेश मुटके, धनंजय आल्हाट, तुषार नवले, अनंत कोऱ्हाळे, रोमी संधू, हाजी मणियार दस्तगीर, डॉ. वैशाली कुलथे, कल्पना शेटे, तुषार नवले, मिनल यादव आदींसह पक्षाचे उपशहरप्रमुख, संघटक, उपसंघटक, सर्व प्रमुख पदाधिकारी आणि शिवसैनिक या मेळाव्यास उपस्थित होते.

# मोदी यांच्या हस्ते औंध रुग्णालयात नवीन आयुष रुग्णालयाचे लोकार्पण

## औंध येथील अतिदक्षता रुग्णालय इमारतीचे भूमिपूजन

**। पिंपरी-चिंचवड।**

'तप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते औंध येथील जिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत नवीन ३० खाटांच्या आयुष रुग्णालयाचे लोकार्पण आणि 'पीएम-अभिम'अंतर्गत नवीन १०० खाटांच्या अतिदक्षता रुग्णालय (क्रिटिकल केअर) इमारतीचे दूरदृष्य प्रणालीद्वारे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार अश्विनी जगताप, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई आदी उपस्थित होते.औंध येथील ३० खाटांच्या आयुष रुग्णालयासाठी राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत ८ कोटी ९९ लाख रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. या रुग्णालयात तळमजल्यावर योगा, प्रतिक्षालय, अभिलेख, प्रक्रिया, मुख्य वैद्य कक्ष तसेच पी.जी.एम. आयुर्वेद कक्ष, स्वच्छता गृह, होमियोपॅथी कक्ष, युनानी, प्रयोगशाळा, मड बाथ नॅचरोपॅथी, नॅचरोपॅथी आदी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच पंचकर्म, क्षारसूत्रा व इतर आयुष उपचार मोफत केले जाणार आहेत. पहिल्या मजल्यावर गर्भसंस्कार कक्ष, बैठक सभागृह, विशेष कक्ष, स्वच्छता गृह, निर्जंतुकीकरण कक्ष, वैद्यकीय अधिकारी कक्ष, स्क्रब रुम, शस्त्रक्रिया गृह, रिकव्हरी रुम, शस्त्रक्रियापूर्व दक्षता कक्ष, पुरुष व महिला कक्ष, प्रतिक्षालय कक्ष, शुश्रुषा कक्ष अशा सुविधा रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. 'पीएम-अभिम' अंतर्गत औंध जिल्हा रुग्णालयात नवीन १०० खाटांच्या अतिदक्षता (क्रिटिकल केअर) रुग्णालयासाठी ४० कोटी ५ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. या रुग्णालयात तळमजल्यावर प्रतिक्षा, वैद्यकीय, मुख्य वैद्यकीय, तपासणी, भांडार, प्रयोगशाळा, नवजात शिशु, वेलनेस, प्रसाधन, तसेच पहिल्या मजल्यावर विलगीकरण कक्ष (आयसोलेशन वॉर्ड) वैद्यक आणि परिचारिका कक्ष, दुसऱ्या मजल्यावर ओटी कॉम्पलेक्स, एचडीयू, अतिदक्षता विभाग आणि इतर सुविधा रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती डॉ. यमपल्ले यांनी दिली आहे.

# मोशी येथे महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

## महाराष्ट्रातील पहिल्या 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'चे उद्घाटन



**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील पहिल्या 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'चे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रात संरक्षण उद्योगाला चालना देण्यासाठी नवे धोरण तयार करण्यात येईल आणि या क्षेत्रातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मोशी येथील इंटरनॅशनल एक्झिबिशन ॲण्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले.जनरल अजय कुमार सिंग, एअर मार्शल विभास पांडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, महेश शिंदे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, निबे लि. चे गणेश निबे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात २०१७ मध्ये एअरोस्पेस आणि डिफेन्स धोरण तयार केले आणि या क्षेत्राला चालना देण्यासाठी १ हजार कोटींचा निधी तयार करण्यात आला. त्यातून ६०० एमएसएमई तयार झाल्या आहेत. केवळ ३०० कोटींतून १२ ते १५ हजार कोटींचे मूल्य या उद्योग संस्थांनी तयार केले. आज जगातले सगळे देश संरक्षण क्षेत्रात भारतासोबत काम करण्यास तयार आहेत. या पार्श्वभूमीवर संरक्षण क्षेत्रातील एमएसएमईसाठी अधिक सुविधा आणि सवलती देण्याचे धोरण स्वीकारण्यात येईल. रोजगार निर्मितीसोबत चांगली शस्त्रास्त्रे राज्यात तयार होतील याचेही प्रयत्न करू, असे श्री.फडणवीस म्हणाले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाची शक्ती ओळखली. आपला देश शस्त्रास्त्रांसाठी परदेशावर अवलंबून होता. आज जगाच्या पाठीवर सामरिक शक्तीत पहिल्या पाचमध्ये असलेले देश स्वत:ची संरक्षण सामग्री स्वत:च्या देशात तयार करून जगाला निर्यात करतात. हीच क्षमता देशात निर्माण करण्यासाठी 'मेक इन इंडिया' वर भर देण्यात आला. भारताने शस्त्र निर्यात करणाऱ्या देशांसाठी त्याचा काही भाग भारतात उत्पादन करावा लागेल आणि निर्मिती तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करावे लागेल अशी अट ठेवली. म्हणून देशात संरक्षण उत्पादन क्षमता निर्माण झाली. जगातील उत्तम शस्त्रसामुग्री देशात निर्माण होत आहे. यामुळे देशाचे लाखो कोटी रुपये वाचले आहेत आणि आपली वाटचाल आत्मनिर्भरतेकडे सुरू आहे. विमान आणि युद्धनौकेसाठी लागणारा ३० टक्के दारुगोळा भारतात तयार होत आहे, असेही श्री.फडणवीस म्हणाले. पुणे हे भारताच्या सामरीक शक्तीच्यादृष्टीने महत्वाचे केंद्र असून गेल्या अनेक वर्षात संरक्षण उत्पादनाची चांगली व्यवस्था पुण्यात निर्माण झाली आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रणी आहे. देशाच्या वायुसेनेचे मेंटेनन्स कमांड, लष्कराचे दक्षिण कमांड, नौदलाचे मुंबई डॉकयार्ड महाराष्ट्रात आहे. नाशिकमध्ये हिंदुस्थान एअरोनॉटिकल्समध्ये तेजस आणि सुखोई अशी लढाऊ विमाने तयार होतात, माझगाव डॉकमध्ये जहाज बांधणीची आधुनिक व्यवस्था आहे, भारत इलेक्ट्रॉनिक्ससारखी संरक्षण क्षेत्रात उच्च तंत्रज्ञानयुक्त काम करणारी यंत्रणा आपल्याकडे आहे. अमरावतीजवळ बीडीएल मिसाईल उत्पादन युनिट सुरू होत आहे. चंद्रयान-३ करता भंडाऱ्याच्या ऑर्डीनन्स फॅक्टरीमध्ये काही भाग बनले. राज्यात ११ ऑर्डीनन्स फॅक्टरी, ५ डिफेन्स पीएसयु, ८ विविध प्रकारच्या प्रयोगशाळा आहे. पुण्यात डिआरडीओची सर्वोत्तम सुविधा आणि देशाची महत्वाची राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीदेखील आहे. म्हणून एमसएसएमईसाठी महत्वाचे स्थान महाराष्ट्र आहे आणि राज्यात पुणे आहे. संरक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. पुणे तंत्रज्ञानाची राजधानी आहे. या क्षेत्रात महाराष्ट्र पुढे गेला आहे. यासाठी पुरवठा साखळीचा भाग होणाऱ्या एमएसएमईसाठी चार क्लस्टर तयार करण्याचे उद्योग विभागाने ठरविले आहे. त्यातून या क्षेत्रात काम करणारे उद्योजक तयार करता येतील.

# तळवडे येथे जैवविविधता उद्यान उभारण्यात येणार

## महापालिकेने मागविले नागरिकांकडून अभिप्राय




**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शहरातील वाढते तापमान तसेच प्रदुषण रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने तळवडे येथे जैवविविधता उद्यान उभारण्यात येणार आहे.

या उद्यानाच्या उभारणीसाठी नागरिकांकडून अभिप्राय मागविण्यात येत असून येत्या सात दिवसांत नागरिकांनी महापालिकेच्या तसेच स्मार्ट सिटीच्या अधिकृत संकेतस्थळावर आणि स्मार्ट सारथी ॲपवर अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले आहे.शहरीकरण व नागरिकीकरणामुळे सरासरी तापमानात आणि प्रदुषणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे शहरातील नैसर्गिक स्त्रोतांच्या संवर्धनासाठी तसेच नागरिकांना जैवविविधता उद्यानाचे महत्व पटवून देण्यासाठी त्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने तळवडे जैवविविधता उद्यानाची संकल्पना साकारण्याचा मानस आहे. नागरिकांच्या अधिक माहितीसाठी तळवडे जैवविविधता उद्यानाचे सादरीकरण महापालिकेच्या या अधिकृत संकेतस्थळावर तसेच पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲपवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. महापालिकेचे स्मार्ट सारथी ॲप एन्ड्रॉइडमध्ये डाऊनलोड करण्यासाठी या लिंकवर तर आयओएसमध्ये डाऊनलोड करण्यासाठी लिंकवर क्लिक करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाजपा जातीमध्ये तेढ निर्माण करतेय

## समाजविरोधात बळाचा वापर केला जात आहे : आदित्य ठाकरे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केल्यानंतर मनोज जरांगे हे मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप होताच वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मात्र मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपानंतर सावध भूमिका घेतली आहे. आधी सर्व चित्र स्पष्ट होऊ द्या मग मी यावर बोलेल असं आदित्य ठाकरे म्हणाले आहेत. राज्यात भाजपा हे जाती आणि धर्मांमध्ये तेढ निर्माण करत आहे. शेतकरी आणि आरक्षण मागण्यांसाठी रस्त्यावर उतरलेल्या समाजविरोधात बळाचा वापर केला जातो आहे. असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे.



ते पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.आदित्य ठाकरे म्हणाले, मनोज जरांगे यांच्यावर काही बोलणार नाही. सर्व चित्र स्पष्ट होऊ द्या. परंतु, अंतरवली सराटीत लाठीचार्ज झाला, त्याचे आदेश गृहमंत्र्यांनी दिले की मुख्यमंत्र्यांनी? याचं उत्तर या सरकारने दिलं पाहिजे. लोक न्याय हक्कांसाठी लढत आहेत. त्यांच्या विरोधात बळाचा वापर केला जात आहे. शेतकरी आणि आरक्षणासाठी लढणाऱ्या समाजाच ऐकून घ्या, चर्चा करा. अस न करता हे सरकार हुकुशाही करत आहे. पुढे ते म्हणाले, जातीत आणि धर्मात भांडणं लावायचं काम भाजप करत आहे. हे विष पेरून काही होणार नाही. राजकारणाचा चोथा झाला आहे. असंही आदित्य ठाकरे म्हणाले.सांताक्रूझ येथील पुलाच्या कामावरून ठाकरे गट आणि शिंदे गटाच्या नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू आहेत. त्याच दरम्यान ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे हे पुणे दौर्यावर होते. त्यावेळी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधताना आदित्य ठाकरे म्हणाले की, काल पोर्णिमा असल्याने त्यांना वेळ नव्हता. अमावस्या आणि पोर्णिमेला शेती करायला जातात. हे त्यांच्या आजपर्यंतच्या दौर्यावरून स्पष्ट होत आहे. त्यामुळे आता तरी पुलाचे उद्घाटन करून नागरिकांची वाहतूक कोंडीमधून सुटका करा, अशी भूमिका मांडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर ठाकरे यांनी टिका केली.यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले की, सांताक्रूझ येथील पुलाच्या कामाबाबत एक फोटो ट्विट केला आहे. त्या पुलाचे काम पूर्ण झाले आहे. पण त्याचे उद्घाटन झाले नाही. त्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. केवळ व्हीआयपींना वेळ नसल्याने अद्यापपर्यंत उद्घाटन झाले नाही. तसेच दुसर्या एका पुलाचे काम अर्धवट आहे. त्याचे उदघाटन करण्यास घटनाबाह्य मुख्यमंत्री आतुर असल्याचे दिसत आहे. आजपर्यंत अर्धवट पुलाच्या कामाचे उदघाटन कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी केल्याचे आपण पाहिले आहे का ? काल पोर्णिमा असल्याने त्यांना वेळ नव्हता. अमावस्या आणि पोर्णिमेला शेती करायला जातात.

### गुंडांना भेटून त्यांचे सत्कार

» राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हजारो कोटींचे ड्रग्ज आढळले आहे. त्या प्रश्नावर आदित्य ठाकरे म्हणाले की, अमली पदार्थांपासून तरुणांनी दूर राहिले पाहिजे. आपण काही घटना पाहिल्या तर काही राजकीय मंडळी गुंडांना भेटून त्यांचे सत्कार करतात. तर दुसर्या बाजूला पोलीस स्टेशनमध्ये गोळीबाराची घटना घडते. त्या सर्व घडामोडी दरम्यान आता ड्रग्ज सापडत आहेत. तसेच काही आमदार पोलिसांबाबत काहीही विधान करत आहेत. आम्हाला कोणी हात लावू शकत नाही. त्यामुळे हे सरकार बिल्डर, ठेकेदार की सर्व सामान्य नागरिकांचे सरकार आहे, असा सवाल उपस्थित करत ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

# बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीचा मार्ग मोकळा

## शिक्षणमंत्र्यांबरोबर झालेल्या चर्चेनंतर बहिष्कार मागे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या मान्य केल्यामुळे बारावीच्या उत्तर पत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे घेतल्याचे महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे यांनी जाहीर केले आहे.

शिक्षण सचिव रणजीतसिंह देवल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, सहसचिव तुषार महाजन, महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, समन्वयक प्रा मुकुंद आंधळकर, सरचिटणीस प्रा. संतोष फासगे, उपाध्यक्ष प्रा. सुनील पूर्णपात्रे बैठकीला उपस्थित होते.जुन्या पेन्शन योजनेसाठी राज्य शासन शासकीय कर्मचाऱ्यांना जे आदेश लागू करेल, तेच कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना लागू होतील असे मान्य करण्यात आले. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासन अनुकूल असून त्याबाबत लवकरच निर्णय जाहीर



होणार आहे. शिक्षकांना शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे लाभ देण्यात येतील हे स्पष्ट करण्यात आले. वाढीव पदावरील प्रलंबित असलेल्या २५३ शिक्षकांच्या त्रुटी पूर्तता करण्यात आल्या असून वित्त विभागाच्या सहमतीने लवकरच त्यांच्या समायोजनाचा आदेश निर्गमित करण्यात येईल. २००१ पासून आयटी विषयाच्या मान्यताप्राप्त शिक्षकांना वेतनश्रेणी मिळण्याबाबतचा प्रश्न प्रलंबित होता. या बाबतीत या शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हता लक्षात घेऊन मान्यताप्राप्त शिक्षकांचे रिक्त पदावर समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. शिक्षकांचे समायोजन ६० दिवसात करण्यात येईल. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना १०, २०, ३० वर्षांची सुधारित सेवांतर्गत वेतनश्रेणी देण्याची योजना शिक्षकांना लागू करण्याबाबत वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून तोपर्यंत शिक्षकांना निवड श्रेणी साठी लागू असलेली २० टक्क्यांची अट उच्च शिक्षणाप्रमाणे शिथिल करण्यात येईल असेही मान शिक्षण मंत्री महोदयांनी मान्य केले. २०/४०/६० टक्के अनुदान घेत असलेल्यांना पुढील टप्पा लवकरच लागू करण्यात येईल असे मान्य करण्यात आले. शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शिक्षण विभागाने २१६७८ पदे भरण्याची प्रक्रिया सुरू केली असून उर्वरित पदे लवकरच भरण्यात येतील असे सांगितले. उर्वरित मागण्यांबाबत आगामी १५ दिवसात बैठक घेण्यात येईल, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

# राष्ट्रवादीने सिंचन, बँक घोटाळा केला ना?

## मोदींना आव्हान देताना अजित पवारांची कोंडी

पुणे ।
न्यूज एक्सप्रेस मराठी।
भाजपाची ज्या राज्यात सत्ता नाही, त्या राज्यातील सरकारांविरोधात असहकार पुकारण्याची नवी पद्धत मोदी सरकारने सुरू केली असल्याची टीका शरद पवार यांनी केली. तसेच गेल्या काही काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर सिंचन घोटाळा, राज्य सहकारी बँकेतील घोटाळ्याचे आरोप केले होते. आमची मागणी आहे की, या घोटाळ्यांची त्यांनी चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, असे आव्हान पंतप्रधान मोदी यांना देत असताना शरद पवार यांनी एकप्रकारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. पुणे जिल्ह्यात पार पडलेल्या इंडिया आघाडीच्या मेळाव्यात शरद पवार यांनी मोदी सरकारवर टीकास्त्र



सोडले.देशाचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यावर टीका करण्याची एकही संधी पंतप्रधान नरेंद्र मोदी सोडत नाहीत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (एसपी) प्रमुख शरद पवार यांनी केली. ज्या नेत्यांनी देशाला दिशा देण्याचे काम केले, त्यांच्याविरोधात द्वेष पसरविण्याचे काम केले जात आहे. पंडित नेहरुंनी देशातील संसदीय लोकशाहीला बळकट करण्याचे काम केले. भारताचे मोल जगाला उमजेल, याची जबाबदारी नेहरुंनी पार पाडली. संपूर्ण विश्वाने त्यांच्या कार्याची दखल घेतली होती. पण पंतप्रधान मोदी त्यांच्या योगदानाला किंमत देत नाहीत. पंतप्रधान मोदींच्या समोर माईक आला की लगेच ते पंडित नेहरुंवर टीका करण्यास सुरुवात करतात, अशा शब्दात शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली.आगामी लोकसभा निवडणुकी आधी विरोधकांची ताकद दाखवून देण्यासाठी इंडिया आघाडीचा पहिला मेळावा शनिवारी (दि. २४ फेब्रुवारी) पुण्यातील काँग्रेस भवनात झाला. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना (उबाठा) नेते सचिन अहिर यांनीही सरकारवर टीका केली. तसेच शरद पवार बोलत असताना त्यांनी मोदी सरकारवर टीकास्र सोडले. शेतातील तण आपण ज्याप्रमाणे उपटतो, त्याप्रमाणे हे सरकार उखडून फेकावे

### मोदी गॅरंटीला तारीख नाही

» तर महागाईचा दर वाढतच असून सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे हे सर्व होत असल्याची टीकाही शरद पवार यांनी केली.शरद पवार पुढे म्हणाले की, केंद्र सरकारकडून नव्या योजना आणि गॅरंटी देण्याची स्पर्धा सुरु आहे. पण मोदी की गॅरंटीला कोणतीही तारीख नाही. गेल्या सत्तर वर्षांत अनेक राज्यकर्ते पाहिले. भाजपचे अटलबिहारी वाजपेयी यांचेही सरकार पाहिले. मात्र गेल्या दहा वर्षांत मोदी यांची भूमिका देशाला दिशा देणाऱ्या व्यक्तींविषयी जनतेच्या मनात घृणा निर्माण करण्याची आहे. त्यामुळे लोकशाहीची चिंता वाटत आहे. नेहरू आणि त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ले करण्याचा आणि त्यांना बदनाम करण्याचा एककलमी कार्यक्रम मोदी यांचा आहे, असा आरोपही त्यांनी केला.

लागेल, असेही शरद पवार यावेळी म्हणाले.भारताची लोकशाही संविधानावर आधारित असून मागच्या १० वर्षांत लोकशाहीवर हल्ले होत आहेत. आगामी निवडणुकीत मतदारच मोदी सरकारच्या चुकीच्या कामांना उत्तर देतील. एकाबाजूला लोकशाही धोक्यात आलेली असताना दुसऱ्या बाजूला सामान्य माणसाला एक ना अनेक अडचणींना सामना करावा लागत आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत. युवकांना रोजगार मिळवण्यासाठी धडपडावे लागत आहे.

# रविंद्र धंगेकरांनी घेतला देवेंद्र फडणवीसांचा समाचार

## पुणे पोलिसांना २५ लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर

पुणे ।
न्यूज एक्सप्रेस मराठी।
पुणे पोलिसांच्या इतिहासात हजारो कोटींचे ड्रेस जप्त करण्यात आल्यानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलिसांच्या कारवाईचे कौतुक करत २५ लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर केलं आहे. त्यावरुन आता आमदार रविंद्र धंगेकरांनी राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री फडणवीसांचा चांगलाच समाचार घेतला आहे. ड्रग्स कारवाईसाठी पुणे पोलिसांना २५ लाखांचं बक्षिस देऊन देवेंद्र






फडणवीस हे गृहखात्याचं अपयश लपवत आहे. एवढंच होतं तर यापूर्वी हे ड्रग्स का नाही सापडलं, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. ललित पाटीलकडे ज्यावेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रग्स सापडले होते. त्यावेळी त्याला अटक केली होती मात्र संजीव ठाकूरला अटक करण्यात आली नाही. संजीव ठाकूरलादेखील अटक करायला हवी होती. तेव्हापासून पुण्यात ड्रग्स रॅकेटची चर्चा आहे. संजीव ठाकूरांना अटक करण्यासाठी गृहखात्याला पत्र दिलं होतं मात्र अजूनही त्यांना अटक करण्यात आली नाही. याचा अर्थ या प्रकरणात भाजपच्या नेत्यांचा काहीतरी संबंध आहे. त्यासोबतच पुण्यात मागील दोन दिवसात ४००० कोटींचं ड्रग्स सापडलं पण मागील वर्षभरापासून ड्रग्स रॅकेटचा खुलासा करा, त्याची पाळेमुळे शोधून काढा, याची मागणी आम्ही करत आहोत. मात्र आताच हे ड्रग्स कसे सापडले. जर हे ड्रग्स आता सापडले तर वर्षभर तपास यंत्रणा काय करत होती? असा प्रश्न मी पुणे पोलिसांना विचारला होता. त्यानंतर काल फडणवीसांनी आपलं अपयश लपवण्यासाठी २५ लाखांचं बक्षिस जाहीर केलं. कुरकुंभमध्ये असणारा ड्रग्सच्या कारखान्याचा मालक कोण आहे. त्याचा शोध घेतला पाहिजे. हा कारखाना दोन दिवसांत नाही तर अनेक वर्षांपासून सुरु होता. त्यामुळे यापूर्वी या कारखान्याची माहिती कशी कोणाला समजली नाही शिवाय संदिप धुनियाचा पोलीस शोध घेत आहे. त्याला २०१६ मध्येही अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्याला जामीन कसा मिळाला,असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत. त्यासोबच या आरोपींना कोणाचातरी वरदहस्त आहे याशिवाय हे प्रकार सुरु राहू शकत नाही, असा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. पुणे पोलीस आणि गृहखात्यानं या सगळ्या ड्रग्स रॅकेटचा खुलासा केला जर यापुढे ड्रग्स विकणारा कधीही असं रॅकेट चालवण्याचं धाडस करणार नाही, असंही ते म्हणाले.